# जाहीर प्रकटन

या प्रकटनाव्दारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत जाहीर करण्यात येते की, अनधिकृत अभ्यासक्रम / शिक्षण संस्थाबाबत विविध तक्रारी संचालनालयास प्राप्त झालेल्या होत्या.सदर तक्रारीबाबत चौकशी अंती खालील शैक्षणिक संस्थांनी विद्यापीठ अनुदान आयोग अथवा कोणत्याही शिखर संस्थेची / समुचित प्राधिकरणाची मान्यता नसताना नियमबाहय पध्दतीने अभ्यासक्रम सुरू केले असून पदव्या दिल्याचे निदर्शनास आलेले आहे. या प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे महाराष्ट्र कृषि,पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च.तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाटयक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील तरतुदीचा भंग होत असल्याने संबंधित व्यवस्थापनास सदरचे कथित शैक्षणिक संस्थेत चालवित असलेले अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाटयक्रम तसेच कथित शैक्षणिक संस्था तात्काळ बंद करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे. त्याची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अनधिकृत विद्यापीठाचे / संस्थेचे नाव व पत्ता |
|---|---|
| ०१ | पुरंदर विद्यापीठ,इ-२/१६,तारादत्त पार्क, सासवड ता.पुरंदर जि.पुणे |
| ०२ | कॉमनवेल्थ व्होकेशनल युनिव्हर्सिटी,१३ बी करन घरोंदा,सैनिक वाडी,वडगाव शेरी,पुणे-४११०१४ |
| ०३ | आयनॉक्स विद्यापीठ, कोरेगावं,(सुभाषनगर)सातारा-४१५५०१. |
| ०४ | विश्वकर्मा क्रिएटिव्ह आय कॉलेज, स.क्र. ३ /६ कोंढवा बु,पुणे-४११०४८ |
| ०५ | ए.टी.आय विद्यापीठ,महावीर चौक,एम.आय.डी.सी.रोड,पंढरपूर बस स्टॅण्ड वाळुज जवळ,औरंगाबाद-४३१००३. |

सबब,उपरोक्त कथित अनधिकृत शैक्षणिक संस्थेत कोणत्याही अभ्यासक्रम/पाटयक्रमास विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नयेत, असे प्रवेश अनधिकृत असतील. प्रस्तुत बाब सर्व संबंधित विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना या जाहीर प्रकटनाव्दारे संचालनालयामार्फत कळविण्यात येत आहे.

(डॉ.धनराज माने) 29/6

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण

महाराष्ट्र राज्य, पुणे-१